लाईव्ह स्ट्रिमिंग विषयक कार्ये पार पाडण्यासाठी
लाईव्ह स्ट्रिमिंग करणाऱ्या संस्थांची यादी

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१९/प्र.क्र. १४ /३४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २२ फेब्रुवारी, २०१९

वाचा :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.वृत्तवित्र-१७/ Empanelment of Live Streaming यादी तयार करण्याबाबत/का-७/९८९ दि.२४/१२/२०१८

प्रस्तावना :-

शासनाच्या विविध योजनांची माहिती जनसामान्यांपर्यत पोहोचविण्यासाठी तसेच ग्रामीण, शहरी, राज्याबाहेरील व आंतरराष्ट्रीय जनतेशी संपर्क साधण्यासाठी आणि प्रशिक्षणासाठी लाईव्ह स्ट्रिमिंगचा उपयोग केला जात आहे. समाजमाध्यमांच्या तंत्रज्ञानात दिवसागणिक बदल होत असून हे तंत्रज्ञान वापरुन अधिकाधिक लोकांपर्यत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. लाईव्ह स्ट्रिमिंग करणाऱ्या (Empanelment of Live Streaming Agencies) संस्थांची यादी तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

शासनाच्या विविध योजनांची माहिती जनसामान्यांपर्यत पोहोचविण्यासाठी तसेच ग्रामीण, शहरी, राज्याबाहेरील व आंतरराष्ट्रीय जनतेशी संपर्क साधण्यासाठी आणि प्रशिक्षणासाठी लाईव्ह स्ट्रिमिंग करणाऱ्या संस्थांची यादी (Empanelment of Live Streaming Agencies) तयार करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत ई-निविदा पध्दतीने जाहिरात क्षेत्रातील विशिष्ट अनुभव व व्यावसायिक अर्हता प्राप्त जाहिरात संस्थांकडून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. या निविदांची छाननी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या स्तरावर करण्यात आली. छाननीअंती पात्र ठरलेल्या खालील संस्थां व दर यांना शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नांव	संर्पकासाठी पत्ता
१	पार्थ नॉलेज नेटवर्क प्रा.लि.	प्लॉट नं. २० सेक्टर १७, ऐरोली, नवी मुंबई ४००७०८
२	टीएसडी कॉपरेशन लि.	बी-३०५, रेजन्सी, तिसरी क्रॉस लेन, लोखंडवाला कॉम्पलेक्स, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३
३	गुरुकूल ऑनलाईन लर्निग सोल्युशन्स प्रा.लि.	श्री कृष्णा निवास, ३ रा मजला, श्रध्दानंद रोड , विर्ले पार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
४	वेबस्ट्रिम कम्युनिकेशन्स प्रा.लि.	१२०४ लोढा सुपरीमस् पवई, साकी विहार समोर, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज, पवई, मुंबई ४०००७२

काम व दराचा तपशील

अ.क्र.	कामाचा तपशील/बाब	एकक	दर (रुपये)
१	एकाच वेळी २००० उपभोक्त्यांना (यूजर्सना) लाईव्ह स्ट्रिमिंग सेवा पुरविणे	प्रति चार तास	१,१९,५००/-
	अतिरिक्त उपभोक्ता	प्रत्येक उपभोक्ता प्रति तास	४.५०
२	महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणीहून कार्यक्रमाचे रिअल टाईम स्ट्रिमिंग करणे	प्रत्येक ठिकाणी ८ तासांसाठी	५,६२,५००/-
	दळणवळण खर्च		
	अ) मुंबई महानगर व उपनगर जिल्हे ठोक रक्कम		१०,०००/-
	आ) मुंबई महानगराबाहेर (मुंबई शहर व उपनगर जिल्हयापासून बाहेर) २०० कि.मी. पर्यंत	प्रति कि.मी.	१८
	इ) मुंबई महानगराबाहेर (मुंबई शहर व उपनगर जिल्हायापासून बाहेर) २०० कि.मी. जास्त अंतरावर	प्रति कि.मी.	२४
३	इलेक्टॉनिक मिडिया interactive आशय (कंटेंट) निर्मिती	प्रति तास	१८५,०००/-
४	महाराष्ट्रात (पॉईट ऑफ डिलेव्हरी) २५ आसन क्षमतेचे एक सुविधा केंद्र उपलब्ध करुन देणे	प्रति तास	९५०
*वरील सर्व दर शासकीय कर/ शुल्क वगळून			

२. सदर यादी शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील दोन वर्षासाठी किंवा नविन यादी तयार करेपर्यंत यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२२१६२३३२३४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.02.22 16:26:47 +05'30'

(रा. ना. मुसळे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य

३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
६. सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई, नागपूर
९. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई, नागपूर
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११.उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२.अधिदान व लेखापरीक्ष अधिकारी मुंबई/ नागपूर
१३.निवड नस्ती का.३४.
१४.उप संचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१५.Parth Knowledge Network Pvt. Ltd, Plot No.२०, Sector No १७, Airoli, Navi Mumbai-४००७०८
१६.TSD Corporation Ltd., B-३०५, Regency, ३rd Cross Lane, Lokandwala Complex, Andheri West, Mumbai-४०००५३
१७.Gurukul Online Learning Solution Pvt Ltd, Shree Krishna Niwas, ३rd Floor, Shraddhanand Road Extn, Vile Parle (East), Mumbai-४०००५७.
१८.Webstream Communication Pvt. Ltd, १२०४-Lodha Supremus Powai, Opp Saki Vihar MTNL Telephone Exchange, Powai, Mumbai-४०००७२
१९.निवड नस्ती का.३४